प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसुन आले आहे.

नोकरी करणाया महिलांना मिळणाया वेतनातून आर्थिक प्राप्ती होते. आर्थिक प्राप्ती होत असल्यामुळे त्या स्वत:च्या मताने त्यांना योग्य वाटणाया स्थितीत आर्थिक विनिमय करणायास स्वतंत्र आहेत. आर्थिक प्राप्ती होत असल्यामुळे त्यांना आवश्यकतेनुसार खर्च करण्याचा अधिकार आहे काय? हे जाणुन घेण्याच्या हेतुने विनिमयाकरीता आर्थिक परावलंबितत्व आहे काय? हा प्रश्न विचारण्यात आला. उत्तरदात्याचे मत सारणी क्र. ३ मध्ये नोंदविण्यात आले आहे.

सारणी क्र. ३
विनिमयाचे आर्थिक परावलंबीत्व

| अ.क्र. | महिला कर्मचा-याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ५६ | २८ |
| २. | नाही | १२५ | ६२.५ |
| ३ | सांगता येत नाही | १९ | ९.५ |
| | एकूण | २०० | १०० |

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ६२.५ टक्के महिलांना आर्थिक परावलंबीत्व नसल्याचे दिसून येते. २८ टक्के महिलांना आर्थिक परावलंबीत्व आहे तर ९.५ टक्के महिलांना याचे उत्तर सांगता आले नाही, यावरुन नोकरी करणाया महिलांना त्यांच्या गरजेनुसार त्या आर्थिक विनिमय करु शकतात म्हणजेच त्यांना खरेदी करण्याकरीता दुसयावर अवलंबून रहावे लागत नाही. नोकरी करणाया महिलाचे आर्थिक परावलंबित्व नोकरीमुळे नष्ट होते असे दिसून येते. तरीही २८ टक्के महिला या आर्थिक बाबीकरीता पतीवर अवलंबून आहेत. २८ टक्के महिला स्वतःचे वेतन कुटुंबातील प्रमुख किंवा पतीकडे जमा करतात आणि त्यांना आवश्यक त्या प्रसंगी पतीकडून काही रक्कम खर्च करण्याकरीता मागावी लागते. हे आर्थिक परावलंबित्व संयुक्त कुटुंबात मोठ्या प्रमाणात दिसून आले आहे.

कुटुंबातील स्थान हे संपत्तीवर निर्धारीत होते. कमावणाया व्यक्तींच्या नावे घरातील संपत्ती असल्यास त्यांचा दर्जा किंवा स्थान उच्च असते. नोकरी करणाया महिलांच्या नावाने घरातील संपत्ती आहे काय ? हे जाणुन घेण्याकरीता तुमच्या नावाने संपत्ती आहे काय? या प्रश्नाच्या माध्यमातून संकलीत केलेले तथ्य सारणी क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

सारणी क्र. ४
संपत्तीची मालकी

| अ.क्र. | महिला कर्मचा-याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | ८ | ४ |
| २. | नाही | १८२ | ९१ |
| ३ | सांगता येत नाही | १० | ५ |
| | एकूण | २०० | १०० |

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ९१ टक्के महिलांच्या नावाने घरातील कोणतीही संपत्ती नाही. तर ४ टक्के महिलांच्या नावाने कुटुंबात संपत्ती आहे. ५ टक्के महिलांना याबद्दल सांगता आले नाही. यावरुन महिला आर्थिक प्राप्ती करीत असल्या तरीही त्यांच्या नावाने कुटुंबात संपत्ती नसल्याचे दिसुन आले आहे. ज्या ४ टक्के महिलांच्या नावे संपत्ती आहे त्यांनी स्वतःहून आर्थिक लाभ घेण्याच्या उद्देशाने स्वत:च्या नावाने संपत्ती केली आहे. ही सर्व संपत्ती कर्जावर नविन बांधलेले घर आहेत. म्हणजेच महिला आर्थिक प्राप्ती करीत असल्या तरीही त्यांच्या नावाने कोणतीही संपत्ती नसुन पतीच्या नावे सर्व आर्थिक व्यवहार चालतांना दिसतात.

**नोकरी करणाया महिलांची सामाजिक स्थिती –**

नोकरी करणाया महिलांना आर्थिक प्राप्तीमुळे समाजात उच्च दर्जा प्राप्त होतो. त्यांना समाजात सन्मानाने वागणुक मिळ्ते. परंतू वाशिम जिल्ह्यातील नोकरी करणाया महिलांना समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त झाले आहे काय, त्यांची सामाजिक स्थिती कशा प्रकारचे आहे याचे अध्ययन करण्याकरीता नोकरी करणाया महिलांना सामाजिक जीवनात पडदा पध्दतीचा वापर करता काय? हे प्रश्न विचारण्यात आले. याची प्राप्त माहिती सारणी क्र. ५ मध्ये दिली आहे.

सारणी क्र. ५
सामाजिक जीवनात पडदा पध्दत

| अ.क्र. | महिला कर्मचा-याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | २४ | १२ |
| २. | नाही | १४८ | ७४ |
| ३ | समारंभ प्रसंगी | २८ | १४ |
| | एकूण | २०० | १०० |

